नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक २७/०९/२०२२ (मंगळवार)**

**(सायंकाळ)**

---

## विनयभंग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. नरखेड** :— दिनांक ०१/१२/२०१५ चे १९.३५ वा. दरम्यान फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. नरखेड येथे अप. क्र. १४१/२०१८ कलम ३५४ भादवी सहकलम ८ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक ०१/१२/२०१५ चे १३.३० वा. सुमारास फिर्यादी व तिची मुलगी/पीडित वय १५ वर्ष या शेतात कापूस वेचण्याकरीता गेल्या असता आरोपी नामे— अरून हिराजी धुर्वे, वय ३० वर्ष, रा. गोधनी(खडकपेठ) नरखेड याने पीडित मुलगी हिचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. आरोपीला दि. ०२.०८.२०२२ रोजी अटक करण्यात आली आहे.

सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक श्री एम.आर. पारडकर यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टमध्ये सादर केले. आज दिंनाक २७/०९/२०२२ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री ओ.पी.जयस्वाल, न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला कलम ८ पोक्सो मध्ये ३ वर्ष सश्रम कारावास व १०००/— रू. दंड व दंड न भरल्यास १५ दिवस साधी कैद अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्रीमती रशमी खापर्डे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन मसपोनि श्रीमती शुभांगी वाझे, पोउपनि भवानीप्रसाद मिश्रा तर कर्मचारी सहा.फौज. श्री. सुनिल डोंगरे, पोहवा मनोज तिवारी, पोहवा मधुकर आदमने यांनी मदत केली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर